दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१८ । सोमवार २५ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

# चेन स्नॅचिंग करणारा आरोपी तोफखाना पोलिसांकडून जेरबंद

### पाईपलाईन रोड परिसरात घडली होती घटना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीच्या गळ्यातील चेन तोडून नेणाऱ्या आरोपीस तोफखाना पोलिसांनी जेरबंद केले आहे. योगेश उर्फ भावड्या अशोक गायकवाड (वय २९ वर्षे, हल्ली रा.भगवानबाबा नगर, पाईपलाईन रोड, मूळ रा. शिंगवे तुकाई, ता. नेवासा) असे त्याचे नाव असून, त्याच्याकडून एक लाख ऐंशी हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक.१३ मे रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास फिर्यादी संतोष विठ्ठलराव गुरळे (वय ४७ वर्षे, रा. साईदीप नगर, शिरसाठ मळा, पाईपलाईन रोड) हे त्यांच्या पत्नीशी फोनवर बोलत असताना एका अनोळखी इसम दारु पिऊन फिर्यादीच्या जवळ आला व फिर्यादीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन घेतला, त्याच्याकडून मोबाईल परत घेतला म्हणून फिर्यादीस धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली व फिर्यादीच्या गळयातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन बळजबरीने हिसकावून घेऊन पळून गेला वगैरे मजकुराच्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या सुचनेप्रमाणे गुन्हे तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर व पथकाने तात्काळ घटना ठिकाणी जाऊन आरोपीचे वर्णन व माहिती घेत शोध सुरु केला.. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी योगेश उर्फ भावड्या अशोक गायकवाड यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून एक लाख ऐंशी हजार रुपये किमतीची १३ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड हस्तगत करण्यात आली आहे. कर्ज फेडण्यासाठी हे कृत्य केल्याची कबुली आरोपीने दिली.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोहेकॉ नितिन उगलमुगले, भानुदास खेडकर, अरुण गांगुर्डे, सुधीर खाडे, सुरज बाबळे, म.पो.ना जिजा खुडे, पो.कॉ सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, सतीश शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड , भागवत बांगर, मपोकॉ कल्पना अवसरे यांच्या पथकाने केली.

# प्रात्यक्षिक सुरू असताना स्मोक ग्रेनेडचा स्फोट

### चार पोलीस कर्मचारी जखमी । पोलीस मुख्यालयातील घटना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस मुख्यालयात आयोजित प्रशिक्षणा दरम्यान धूर सोडणाऱ्या ग्रेनेडचा (स्मोक ग्रेनेड) हातात स्फोट होऊन चार पोलीस कर्मचारी जखमी झाले. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शुभम कावरे, शिवराज पवार, योगेश साळुंके व गणेश मधे अशी जखमी कर्मचाऱ्यांची नावे असून,हे चौघेजण शीघ्र कृती दलात (रॅपिड ॲक्शन फोर्स) कार्यरत आहेत.

पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचाऱ्यांना विविध शस्त्रास्त्रांची माहिती देण्यात येत होती. यावेळी धूर सोडणाऱ्या हाताने फेकावयाच्या स्मोक ग्रेनेडबाबत माहिती देणे सुरू असताना प्रशिक्षणार्थी पोलिसांच्या हातातच ग्रेनेडचा स्फोट झाल्याने चार कर्मचारी जखमी झाले. त्यात शिवराज पवार व शुभम कावरे यांच्या हाताच्या बोटांना गंभीर दुखापत झाली. जखमी कर्मचाऱ्यांवर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

#### स्फोटाच्या आवाजाने गोंधळ

दंगल नियंत्रण पथकाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत हे प्रशिक्षण सुरु होते. प्रशिक्षण सत्रात कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या शस्त्रास्त्रांची आणि उपकरणांची माहिती देण्यात येत होती. यावेळी स्मोक ग्रेनेडचे प्रात्यक्षिक दाखवत असताना अचानक हातात ग्रेनेडचा मोठा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज आणि अचानक झालेल्या या दुर्घटनेमुळे पोलीस मुख्यालयाच्या परिसरात काही काळ प्रचंड गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

#### ग्रेनेडमध्ये तांत्रिक बिघाड असल्याने घडली घटना?

पोलीस मुख्यालयात सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी व आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते अशी प्रशिक्षण शिबिरे येथे नेहमी होतात. परंतु आज झालेल्या घटनेत हातात ग्रेनेड फुटल्याने प्रशिक्षणादरम्यान घ्यावयाच्या काळजीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ही घटना ग्रेनेडमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे घडल्याचे सांगण्यात येत आहे.

# रूईछत्तीशीचा पाणीपश्न मार्गी लावण्यासाठी ग्रामस्थ एकवटले

### ग्रामसभेत एकमुखी निर्णय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील रूईछत्तीशी गावाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ग्रामस्थ एकवटले असून, आज, सोमवारी झालेल्या ग्रामसभेत सर्वानुमते यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरविण्यात आले.

नगर-सोलापूर रस्त्यावर रूईछत्तीशी हे गाव असून, गावाला पाणीप्रश्न सातत्याने भेडसावत आहे. या प्रश्नावर सत्ताधारी व विरोधक यांनी एकत्र येत गावाला पाणीटंचाईतून कायमचे मुक्त करण्यासाठी पावले उचलण्याचे ठरविले आहे.

आज, सोमवारी या संदर्भात झालेल्या ग्रामसभेस सत्ताधारी-विरोधक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्नावर गावातील सत्ताधारी-विरोधक यांचे एकमत होऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी एकत्रित पाठपुरावा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

# शेअर बाजारात तेजी

**मुंबई । वृत्तसंस्था –** भारतीय शेअर बाजारात आज जोरदार तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्स आणि निफ्टी ५० निर्देशांक १ टक्क्यांनी वधारले. सेन्सेक्स १०७४ अंकांनी वधारुन ७६४८८.९६ अंकांवर बंद झाला. तर, निफ्टी ५० निर्देशांक २४०३१.७० अंकांवर बंद झाला. बीएसई १५० मिडकॅप आमि बीएसई २५० स्मॉलकॅपमध्ये देखील तेजी दिसून आली.

शेअर बाजारात आज बजाज फायनान्स, एचडीएफसी बँक, इटरनल, एल अँड टीच्या शेअरमध्ये सर्वाधिक तेजी दिसून आली. तर, इन्फोसिस, टीसीएस आणि हिंदुस्थान यूनीलिव्हरच्या शेअरमध्ये घसरण पाहायला मिळाली.

निफ्टी बँक, वित्तीय सेवा, खासगी बँकांच्या शेअरमध्ये तेजी दिसून आली. निफ्टी पीएसयू बँक निर्देशांक ३ टक्क्यांनी वधारला. निफ्टी ऑटो, रिअल्टी, ऑईल अँड गॅस, कंझ्युमर ड्युरेबल्सच्या शेअरमध्ये देखील तेजी पाहायला मिळाली. तर निफ्टी एफएमसीजीच्या मध्ये घसरण झाली.

शेअर बाजारातील आजच्या तेजीमुळं गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ६ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४६३ लाख कोटी रुपयांवरुन वाढून ४६९ लाख कोटी रुपयांवर पोहोचलं आहे.
अमेरिका आणि इराण यांच्यात करार होण्याची शक्यता, क्रूड ऑईलच्या दरात झालेली घसरण, क्रूड ऑईलच्या एका बॅरलचा दर ९८ डॉलर्सपर्यंत घसरला.याशिवाय रुपया मजबूत होणे. अमेरिकन डॉलर आणि बाँड यील्ड मध्ये घसरण झाल्यानं बाजारात त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला.

### सीना नदी पूर नियंत्रण रेषेसाठी विचार मंचाची स्थापना

# ब्लुलाईन आणि रेडलाईन शिथिल करण्याबाबत शासन दरबारी पाठपुरावा करणार - भगवान फुलसौंदर

### बाधित जमीन धारकांच्या न्यायासाठी एकत्रित लढा उभारणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातून वाहणाऱ्या सीना नदी तसेच संबंधित नाल्यांच्या पूरनियंत्रण रेषेमुळे बाधित झालेल्या जमीन व प्लॉटधारकांच्या प्रश्नांसाठी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ''सीना नदी पूरनियंत्रण रेषा विचार मंच''ची स्थापना करण्यात आली आहे. शहरातील विविध भागांतील नागरिक, प्लॉटधारक आणि व्यापाऱ्यांच्या वाढत्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर हा मंच स्थापन करण्यात आला असून, यासाठी पहिली बैठक पार पडली.



सन २०१९ साली राज्य सरकारकडून सीना नदीच्या दोन्ही काठांवर पूरनियंत्रण रेषेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली . शहरातील अनेक भागांतील सुमारे ३० टक्के बांधकामयोग्य क्षेत्र बाधित होत असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. बोल्हेगाव ते बुरुडगाव परिसरातील शेकडो जमीनधारक व प्लॉटधारकांनी आपल्या व्यथा स्थानिक नगरसेवकांसमोर मांडल्या होत्या. त्यानंतर सर्व नगरसेवकांनी एकत्र येत आमदार संग्राम जगताप यांची भेट घेऊन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले.

यापूर्वीही या विषयावर शासनदरबारी पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र सरकार बदलल्यानंतर हा प्रश्न पुन्हा नव्याने मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बाधित नागरिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी ''सीना नदी पूरनियंत्रण रेषा विचार मंच'' स्थापन करण्यात आला. या मंचाच्या माध्यमातून शासनाकडे ठोस भूमिका मांडून न्याय मिळवण्यासाठी संघटित लढा उभारण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीला जवळपास तीनशेहून अधिक प्लॉटधारक उपस्थित होते.

अहिल्यानगर शहरातील लक्ष्मी नारायण मंगल कार्यलय येथे याची बेठक पार पडली यावेळी माजी महापौर भगवान फुलसोंदर ,किशोर डागवाले , ॲड अभय आगरकर ,उपमहापौर धनंजय जाधव, अनिल बोरुडे , दत्ता गाडळकर, महेश लोंढे, अभिजित बोरुडे ,पुष्कर कुलकर्णी , शरद ठाणगे ,विष्णू फुलसौंदर,अर्जुन बोरुडे ,शंकर ठाणगे ,राजेंद्र पडोळे ,ब्रिजेश ताठे ,चंद्रकांत फुलारी ,अशोक आगरकर ,राजेंद्र एकाडे,बाळासाहेब पवार ,राहुल व्यवहारे ,अर्जुन रोहकले , रोहित व्यवहारे ,सुडके ,गाडीलकर ,जाधव आदींसह विविध भागांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बैठकीदरम्यान नागरिकांनी आपल्या समस्या मांडत चुकीच्या पूरनियंत्रण रेषेमुळे होणाऱ्या आर्थिक व मानसिक नुकसानीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

या बैठकीस तज्ज्ञ म्हणून आर्किटेक्ट इंजिनिअर असोसिएशनचे स्थापत्य अभियंता संजय पवार आणि प्रकाश जैन यांना आमंत्रित करण्यात आले होते. अभियंता संजय पवार यांनी पूरनियंत्रण रेषेचे तांत्रिक पैलू, त्याचा नागरिकांवर होणारा परिणाम तसेच शासनस्तरावर कोणत्या पद्धतीने लढा द्यावा लागेल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रकाश जैन यांनीदेखील पूरनियंत्रण रेषेच्या सद्यस्थितीचे विश्लेषण करत अनेक तांत्रिक मुद्दे उपस्थित केले.

■ पान ४ वर

### सीना नदी पात्र पाहणी झाली, पण प्रश्न सुटला नाही

# आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका – किरण काळे

### पूररेषा प्रश्नावर ठाकरे शिवसेना आक्रमक होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**सीना नदीच्या पूररेषेमुळे निर्माण झालेल्या समस्यां बाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी बाधित नागरिकांना दिलासा मिळवून देण्यासाठी ठाकरे शिवसेना शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे म्हटले आहे. प्रशासन, शासनाच्या गंभीर चुकी मुळे हजारो नगरकर त्रस्त आहेत. सीना नदी पात्राची आजवर अनेक वेळा पाहणी झाली, बैठका झाल्या. पण प्रश्न काही सुटला नाही. आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका. अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.



काळे म्हणाले की, सीना नदी आणि संबंधित नाल्यांच्या पूरनियंत्रण रेषांमुळे शहरातील हजारो जमीनधारक, प्लॉटधारक आणि नागरिक अडचणीत आले आहेत. चुकीच्या पद्धतीने आखण्यात आलेल्या पूररेषेमुळे अनेक भागातील बांधकामयोग्य क्षेत्र प्रभावित झाले असून नागरिकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांनी आयुष्यभराची जमा-पूंजी खर्च करून प्लॉट खरेदी केले, मात्र आता त्या जागेवर बांधकाम करता येत नसल्याने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

**आतापर्यंत केवळ फोटोसेशन :**
किरण काळे म्हणाले, या प्रश्नामुळे शहराच्या विकासालाही मोठा फटका बसत आहे. हजारो प्लॉटधारक आणि व्यावसायिकांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून या विषयाचा सर्वंकष अभ्यास करून पूररेषेचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. यापूर्वी लोकप्रतिनिधींच्या पुढाकारातून काही बैठका पार पडल्या होत्या. खात्याचे मंत्री, अधिकाऱ्यां समक्ष प्रत्यक्ष नदीपात्राची पाहणी करत नुसते फोटोसेशन करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात प्रश्न सुटला नाही. आता बाधितांचा अंत पाहू नये. वेळ प्रसंगी ठाकरे शिवसेना आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

**बाधितांना ठाकरे शिवसेनेचे आवाहन :**
बाधित नागरिकांना आवाहन करताना काळे यांनी सांगितले की, या परिस्थितीत कोणत्याही नागरिकाने निराश होऊ नये. प्रभावित नागरिकांच्या न्याय्य

■ पान ४ वर


## दै. आकर्षण निवडक

### भीमथडी साहित्य संमेलनात डोंगरे यांचा विशेष सन्मान



अहिल्यानगर- ग्रामीण भागातील साहित्य चळवळीला चालना देत समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करणारे सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांचा चौफुला केडगाव (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित राज्यस्तरीय भीमथडी साहित्य संमेलनात विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. दि. २३ व २४ मे रोजी दोन दिवस पार पडलेल्या या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार राहुल कुल यांच्या हस्ते उत्साहात झाले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, ज्येष्ठ साहित्यिक फ. मु. शिंदे, संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांच्यासह पै. डोंगरे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी साहित्य, संस्कृती आणि ग्रामीण जनजागृतीचा संगम घडवणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता. पै. नाना डोंगरे यांनी ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिक, कवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गावागावांत साहित्याची गोडी निर्माण व्हावी, ग्रामीण प्रतिभेला योग्य दिशा मिळावी आणि सामाजिक प्रश्नांवर जागृती व्हावी या उद्देशाने त्यांनी विविध साहित्यिक व सामाजिक उपक्रम राबविले आहेत.

### केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष किरण खुर्जेकर यांचे दुःखद निधन



अहिल्यानगर- केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष किरण उर्फ प्रमोद खुर्जेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ मे २०२६ निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.केडगाव ब्राह्मण सेवा संघाच्या स्थापनेपासून म्हणजेच सुमारे २७ ते २८ वर्षापासून संघाच्या सर्व उपक्रमाचे नेतृत्व त्यांनी केले होते, केडगाव ब्राह्मण सेवा संघ दरवर्षी सामुदायिक व्रतबंध आयोजित करत असतो या सामूहिक उपक्रमात श्री खुर्जेकर यांचा मोलाचे सहभाग असायचा. तसेच अंबिकानगर आणि केडगाव परिसरात एक सुसंस्कृत आणि सुस्वाभावी व्यक्तिमत्व म्हणून खुर्जेकर हे परिचित होते. परिसरातील कोणाचेही काही काम असेल तरी श्री खुर्जेकर आपल्या ओळखीतून ते कार्य तडीस न्यायचे. अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने केडगाव ब्राह्मण सेवा संघात खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे असे संघाचे अध्यक्ष श्री नंदकुमार पोळ यांनी आपल्या शोक संदेशात श्रद्धांजली अर्पण केली. श्री किरण खुर्जेकर हे परशुराम प्रतिष्ठान अहिल्यानगर तसेच सकल ब्राह्मण महासंघ अहिल्यानगर आणि समर्थ परिवार अहिल्यानगर येथे सुद्धा सक्रिय सभासद होते. त्यांच्या आकस्मित जाण्याने संघाचे सर्व सभासद आणि कार्यकारी संचालक हे शोक सागरात बुडाले आहे.

# न्यू आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात

## गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाचे भूषण– अध्यक्ष रामचंद्रजी दरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, अहिल्यानगर या गौरवशाली परंपरा लाभलेल्या शैक्षणिक संस्थेने सन २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एच.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रामचंद्रजी दरे यांनी ''गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाचे खरे भूषण असून त्यांच्या यशामुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध होत असते,'' असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी सातत्य, मेहनत आणि शिस्त यांच्या जोरावर यश संपादन केल्याचे सांगत त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल तब्बल ९९.२८ टक्के लागला असून कु. कोठुळे प्रणाली बाबासाहेब हिने ८८.०० टक्के गुण मिळवत शाखेत प्रथम क्रमांक पटकावला. कॉमर्स शाखेचा निकाल ९१.७० टक्के लागला असून कु. गायकवाड क्षितिजा अर्जुन हिने ९२.३३ टक्के गुणांसह महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ९२.८९ टक्के लागला असून कु. सोनवणे तनुजा पांडुरंग हिने ८६.१७ टक्के गुण मिळवत शाखेत प्रथम क्रमांक संपादन केला.

तसेच एच.एस.सी. व्होकेशनल विभागाचाही निकाल उल्लेखनीय ठरला असून विभागाचा एकूण निकाल ९७.३६ टक्के लागला आहे. फूड प्रॉडक्ट अँड टेक्नॉलॉजी विभागातील विद्यार्थी चि. राम रमेश वाबळे याने ७९.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९५.९६ टक्के लागल्याने संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात नीट, जेईई, सीईटी, सीए तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे मोफत मार्गदर्शन केले जाते. याशिवाय करिअर मार्गदर्शन मेळावे, पालक मेळावे, विविध व्याख्याने, फन फेअर यांसारखे उपक्रम नियमित आयोजित करण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांसाठी मोफत पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण व ब्युटी पार्लर प्रशिक्षणही दिले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ताविकासास मोठी मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. सौ. कल्पना कानवडे (दारकुंडे) मॅडम यांनी केले. या गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभास अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव मा. अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मा. मुकेश दादा मुळे, खजिनदार मा. अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य प्रा. सौ. कल्पना कानवडे (दारकुंडे), पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे, सर्व शाखांचे समन्वयक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना म्हस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे यांनी मानले.

## महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती स्मारकासाठी सदर जागा उपलब्ध करुन देण्यात यावी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासह भव्यदिव्य असे स्मारक व्हावे त्यामध्ये वाचनालय, अभ्यासिका, संस्कार वर्ग, पुर्व परिक्षा केंद्र, ऑडीटोरिअम हॉल, ग्रंथालय यांची निर्मिती करुन असे अद्यावत स्मारक होणे गरजेचे आहे.

जगाला शिक्षणाचा संदेश देणारे फुले दाम्पत्य स्त्री शिक्षणाचा जागर करणाऱ्या महान पुरुषांचे स्मारक त्यांच्या विचारांनी झाले पाहिजे व ते होणे गरजेचे आहे. असे स्मारक करण्यासाठी १० ते १५ हजार स्क्वेअर फुट जागेची गरज असून ही जागा आपण अध्यक्ष असलेल्या वाडियापार्क क्रिडा संकुल मध्ये उपलब्ध आहे. महात्मा फुले शाळेसमोरील जागा ही टी.पी. स्कीम नं. ३, फायनल प्लॉट नं. १९३ या ठिकाणी असून यामध्ये आम्ही मागणी केलेल्या व फुलेंच्या विचारांचे स्मारक तेथे बांधता येईल. त्यांचा जीवनपट तिथे सादर करता येईल. असे स्मारक जे महाराष्ट्राला दिशा देणारे असेल.

पर्यटकांची गर्दी वाढुन हे स्मारक नावलौकीक ठरेल. त्यामुळे आपण अध्यक्ष या नात्याने सदर जागेची पाहणी समक्ष करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा व आपण जागा निश्चित करुन त्यावर आदर्श स्मारकासाठी इंजिनिअरींग असोसिएशन व इतर क्रिडाई सारख्या संस्थांकडून याचे डिझाईन करण्यात यावे व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती स्मारकासाठी सदर जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना निवेदनाद्वारे केली आहे यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख संभाजी कदम ,गटनेते दत्तात्रय कावरे , ,विनय वाखुरे ,संजय आव्हाड ,अरुण झेंडे ,चेतन शिरसुल आदी उपस्थित होते.

## आर्किटेक्ट तुषार चांडक व इंजिनिअर ओमप्रकाश चांडक यांना बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट, इंजिनअर व सर्वेयर असोसिएशन, अहिल्यानगर व पोलाद स्टील लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आर्किटेक्ट तुषार चांडक व इंजिनिअर ओमप्रकाश चांडक यांना बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले. २०० स्क्वेअर मीटरवरील बांधकाम असलेल्या रेसिडेन्शियल बंगलो असलेल्या कॅटेगरी मधे चांडक यांना पहिल्या क्रमांकाने गौरविण्यात आले.

उत्कृष्ट आर्किटेक्ट व उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक म्हणून त्यांना हा अवार्ड प्राप्त झाला. हा पुरस्कार कमल आनंदराम मुनोत यांचे वास्तूस प्रदान करण्यात आला आहे. सदर वास्तूचे आरसीसी डिझाइन पंकज झावरे यांनी केले. तेही यावेळी उपस्थित होते.

सदर पुरस्कार जितेंद्र भोपळे. डायरेक्टर टाउन प्लानिंग डिपार्टमेंट, महाराष्ट्र राज्य. पुणे, सहायक संचालक स्नेहल यादव, अभिजीत देवी ,प्रदीप तांदळे, भूषण पांडव, संजय चांदवले यांचे हस्ते देण्यात आला.

हा सन्मान त्यांच्या गुणवत्तेची, नाविन्यपूर्ण दृष्टीची आणि उत्कृष्ट कार्याची पावती आहे. तुषार चांडक यांना यापूर्वी ४० अंडर ४० इलाईट एंड ट्रेंड सेटर आर्किटेक्ट ॲण्ड इंटेरियर डिझायनर ऑफ द ईयर २०२४ हा पुरस्कार मिळाला आहे. त्याच प्रमाणे इंडिया ट्रेड सेटर २०२४ गोवा येथेही प्रीमियम रेसिडेंन्शियल कॅटगरी मध्ये बेस्ट आर्किटेक्ट ऑफ द ईयर २०२४ हा पुरस्कार मिळाला आहे . त्याच प्रमाणे इंडियन काँक्रेट इन्स्टिट्यूट,पुणे आणि अल्ट्राटेक सिमेंट यांचे तर्फे बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड २०२५ मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल ओमप्रकाश चांडक व तुषार चांडक या पितापुत्रांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अकोले तालुक्यातील ओम साई काऊ फार्मचा राष्ट्रीय स्तरावर डंका

### एबीएस इंडिया अडर चॅलेंजमध्ये पटकावला प्रथम क्रमांक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अकोले तालुक्यातील अंबड येथील सुशिक्षित आणि प्रयोगशील तरुण उद्योजक मिलिंद नाईकवाडी आणि सौ. शितल मिलिंद नाईकवाडी यांच्या ओम साई काऊ फार्ममधील गाईने एबीएस इंडिया उडर चॅलेंज या देशपातळीवरील मानाच्या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून (झोन ४) प्रथम क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ग्रामीण भागातील एका तरुण दांपत्याने जिद्द आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर दुग्ध व्यवसायात मिळवलेले हे यश संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

काय आहे एबीएस इंडिया अडर चॅलेंज?

एबीएस इंडिया ही जगातील पशुवंश सुधारणा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चांगल्या जातीच्या जनावरांचे संगोपन आणि प्रजननाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ही कंपनी अडर चॅलेंज स्पर्धा आयोजित करते. यामध्ये गाईची शरीररचना, कासेची ठेवण , दुध उत्पादनाची क्षमता आणि अनुवंशिकता या निकषांवर बारकाईने परीक्षण केले जाते. नाईकवाडी यांच्या गाईने या सर्व निकषांत बाजी मारत प्रथम स्थान मिळवले. ही गाय एबीएसच्या (आरमाडा) या वळूची मुलगी असून ती होल्स्टीन फ्रीजियन () जातीची आहे.

शून्य ते शंभर: मेहनतीचा यशस्वी प्रवास*

मिलिंद नाईकवाडी हे उच्चशिक्षित असूनही त्यांनी पारंपरिक नोकरीच्या मागे न लागता आधुनिक दुग्ध व्यवसायाची वाट धरली. अतिशय कष्टाने आणि नियोजनाने त्यांनी अंबड सारख्या ग्रामीण भागात १०० गायींचा सुसज्ज असा गोठा उभा केला आहे. ओम साई काऊ फार्म हे केवळ दुध काढण्याचे केंद्र नसून, ते आधुनिक पशुपालनाचे एक उत्तम मॉडेल बनले आहे. स्वच्छ दूध उत्पादन, जनावरांचे संतुलित आहार व्यवस्थापन आणि वेळेवर लसीकरण या त्रिसूत्रीचा वापर करून त्यांनी हा व्यवसाय नफ्यात आणला आहे.

शितल नाईकवाडी यांची मोलाची साथ

या व्यवसायाच्या यशामध्ये सौ. शितल नाईकवाडी यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. एका बाजूला प्रपंच आणि दुसऱ्या बाजूला गोठ्याचे बारकावे सांभाळत त्यांनी या व्यवसायाला व्यावसायिक वळण दिले आहे. ग्रामीण भागातील महिला केवळ घर सांभाळू शकत नाहीत, तर त्या यशस्वी उद्योजकही होऊ शकतात, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आह.तसेच वडील साईनाथ नाईकवाडी, आई शारदा नाईकवाडी, भाऊ निलेश नाईकवाडी आणि वहिनी रेश्मा नाईकवाडी यांचीही मान उंचावली.

## शिव पाणंदच्या प्रलंबित प्रकरणांसाठी १ व २ जूनला 'चलो मंत्रालय' आंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राज्यातील शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने १ व २ जून रोजी ''चलो मंत्रालय''चा नारा दिला आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील पदाधिकारी व शेतकरी मंत्रालयात जाऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच संबंधित विभागांकडे पुराव्यासह निवेदने सादर करणार आहेत.

शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून ग्राम, तालुका, जिल्हा स्तरापासून मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करून शेतरस्त्यांसंदर्भात विविध महत्त्वपूर्ण शासननिर्णय मंजूर करण्यात यश मिळाले आहे. मात्र, काही भागांमध्ये अधिकारी शासननिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करत असताना अनेक ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांना अजूनही हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप पवळे यांनी केला आहे.

राज्यात शिव पाणंद प्रकरणांसाठी 'झिरो पेंडन्सी अभियान' राबवावे, तालुका, जिल्हा व मंत्रालय स्तरावर मासिक बैठकांचे आयोजन करावे, सर्व शेतरस्त्यांची नोंद घेऊन दगडी नंबरीद्वारे हद्द निश्चित करावी, तसेच सातत्याने सर्वेक्षण करून रस्त्यांचे मजबुतीकरण करावे, अशी मागणी चळवळीने केली आहे.

तसेच तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेली शेतरस्त्यांची प्रकरणे विशेष बाब म्हणून तातडीने निकाली काढावीत, शेतरस्त्याअभावी पडीत राहणाऱ्या जमिनींसाठी संबंधित जबाबदारांकडून नुकसानभरपाई द्यावी, क्षेत्रीय समित्यांमध्ये चळवळीच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व द्यावे, तसेच सर्व कार्यालयांमधील अहवाल सार्वजनिकपणे प्रदर्शित करावेत, अशाही मागण्या करण्यात आल्या आहेत.

तहसीलदार कार्यालयातील अर्जांवर उत्तर देणे बंधनकारक करावे, प्रलंबित किंवा त्रुटी असलेले अर्ज तातडीने दुरुस्त करावेत, तहसीलदारांच्या आदेशांचे प्रांत व जिल्हाधिकारी स्तरावर अंतिम सर्वेक्षण करून अपील प्रक्रिया सुलभ करावी, तसेच न्यायालयीन प्रकरणे महसूल विभागाकडे वर्ग करून 'फास्ट ट्रॅक' पद्धतीने निकाली काढावीत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

# स्वप्नांच्या पंखांना बळ देण्याचे काम बँक करते - नयनकुमार दुबे

## आउटरीच कॅम्पमधून सर्वसामान्यांच्या स्वप्नांना नवी झेप । सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून १६७ खातेधारकांना १५ कोटींचे कर्जवाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सर्वसामान्य नागरिकांच्या स्वप्नांना आर्थिक बळ देत त्यांची प्रगती साधण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया सातत्याने कार्यरत असून शिक्षण, गृह, वाहन तसेच उद्योजकतेच्या प्रत्येक टप्प्यावर बँक ग्राहकांच्या पाठीशी उभी असल्याचे प्रतिपादन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नयनकुमार दुबे यांनी केले.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कॅम्प २०२६' मध्ये ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रीडाईचे सचिव दीपक बांगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी उद्योजक शिवदास डोके, एलडीएम आशिष नवले, मुख्य प्रबंधक संजय कराड डी. पी. काळे, प्रमोद दहिफळे बि डी शिरसाठ यांच्यासह ग्राहक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नयनकुमार दुबे म्हणाले, ''मध्यमवर्गीय कुटुंबासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही केवळ बँक नसून त्यांच्या कुटुंबाचा एक भाग आहे. प्रत्येक जण आयुष्यात मोठी स्वप्ने पाहतो, मात्र ती पूर्ण करण्यासाठी विश्वासार्ह साथीदाराची गरज असते. बँक त्या स्वप्नांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम करत आहे.''

दीपक बांगर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया नेहमीच सर्वसामान्यांच्या पाठीशी उभी राहिली आहे. गृहकर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज अशा विविध योजनांद्वारे ग्राहकांना नवी उभारी मिळत आहे. या कॅम्पमध्ये १६७ खातेधारकांना १५ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण करण्यात आले असून त्यामुळे अनेकांची स्वप्ने साकार होण्यास मदत होणार आहे. ग्राहकांनी घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करून आपली पत अधिक मजबूत करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

एलडीएम आशिष नवले यांनी सांगितले की, सर्वसामान्य जनतेपर्यंत बँकेच्या योजना, सेवा व आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी पोहोचाव्यात या सामाजिक भावनेतून अशा कॅम्पचे आयोजन करण्यात येते. ग्राहकांची आर्थिक उन्नती साधण्यास या उपक्रमांचा मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान सागर तनपुरे यांनी पीपीटीच्या माध्यमातून बँकेच्या विविध कर्ज योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद दहिफळे यांनी केले तर आभार प्रदर्शन आशिष नवले यांनी मानले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### प्रा. वर्षा पाठक यांना ''काव्य शिरोमणी'' पुरस्कार



अहिल्यानगर - साहित्य, शिक्षण आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रा. सौ. वर्षा सचिन रोडे पाठक यांचा दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित ''साहित्य संस्कृती संगम संमेलन'' मध्ये इंटरनॅशनल आयकॉन डॉ.जयलक्ष्मी सानिपींना यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. सौ. वर्षा पाठक या गेल्या १४ वर्षांपासून अहिल्यानगर आकाशवाणी येथे नैमित्तिक उद्घोषिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी, अहिल्यानगर येथे ज्युनियर कॉलेज विभागात अध्यापनाचे कार्य करतात. याशिवाय हार्मोनी इंटरनॅशनल स्कूल, वडगाव गुप्ता येथे समुपदेशक म्हणूनही त्या कार्यरत आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील ''काव्य शिरोमणी'' पुरस्कार देण्यात आला आहे. श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेचे शालेय समिती चेअरमन अँड . किशोर देशपांडे व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापिका तथा प्राचार्य वसुधा जोशी यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

### श्री बालाजी देवस्थानात विष्णू पंचायतन याग उत्साहात

अहिल्यानगर - शहरातील खिस्त गल्ली परिसरातील श्री बालाजी देवस्थान येथे दि. २३ व २४ मे २०२६ रोजी दोन दिवसीय विष्णू पंचायतन यागाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन, धार्मिक विधी आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमाची सुरुवात दि. २३ मे रोजी सकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत महाअभिषेक, तुलसी अर्चन व पुष्प सहस्रअर्चनाने झाली. भक्तांच्या मंत्रोच्चारांनी व वेदघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.दि. २४ मे रोजी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत विधिवत विष्णू पंचायतन याग पार पडला. त्यानंतर दुपारी १.०० ते ३.०० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.या धार्मिक कार्यक्रमासाठी उमेश श्रीकांत खांडकेकर, संजय सप्तर्षी, श्रीकृष्ण बिवलकर, राजेश भिडे आणि सागर देशपांडे यांनी यजमान म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच उमेश खांडकेकर, श्रीराम पोळ गुरुजी, प्रसाद देव, औ इत्वधने, समर्थ सप्तर्षी आणि वेदांत कुलकर्णी यांनी गुरुजी म्हणून विविध धार्मिक विधी संपन्न केले. श्री बालाजी देवस्थानतर्फे आयोजित या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

### अहिल्यानगरच्या बोथरा परिवाराचे श्री केदारनाथ धाम येथे सहकुटुंब दर्शन

अहिल्यानगर - शहरातील प्रसिद्ध व्यापारी श्री सागर बोथरा यांनी दिनांक २२ मे २०२६ रोजी पवित्र श्री केदारनाथ धाम येथे सहकुटुंब दर्शन घेतले. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या पवित्र तीर्थक्षेत्री दर्शन घेताना अत्यंत सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांती व आध्यात्मिक समाधानाची अनुभूती मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या पवित्र यात्रेत श्री सागर बोथरा यांच्यासह त्यांच्या मातोश्री श्रीमती अरुणा बोथरा, सौ. दर्शना बोथरा, कृतिका बोथरा, भूमी बोथरा तसेच मयंक बोथरा यांनीही सहभागी होत भगवान श्री केदारनाथांचे दर्शन घेतले. संपूर्ण यात्रा हेलिकॉप्टरद्वारे करण्यात आल्याने प्रवास अधिक सुलभ व आनंददायी ठरल्याचे सांगण्यात आले.

# नेवासा पोलीस ठाण्यात कंपनी चालकाची मनमानी; चेहरा पाहून ड्युट्या लावल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी!

**नवीन पोलीस निरीक्षक ढिकले साहेब तात्काळ बदल करणार का? पोलीस वर्तुळात खमंग चर्चा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा पोलीस ठाण्यातील अंतर्गत कारभार सध्या चांगलाच चव्हाट्यावर आला असून, येथील कंपनी चालक (ड्युटी लावणारे अंमलदार) यांच्या मनमानी आणि पक्षपाती कारभारामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांवरच आता अंतर्गत वजन आणि चेहरा पाहून ड्युट्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप होत असून, पोलीस वर्तुळात याची जोरदार आणि खमंग चर्चा रंगली आहे.

**नियम बाजूला, चेहरा बघून ड्युटी!**

मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, नेवासा पोलीस ठाण्यात कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन ड्युट्यांचे नियोजन करणाऱ्या कंपनी चालकाकडून ठराविक कर्मचाऱ्यांनाच सोयीच्या आणि अर्थपूर्ण जागांवर नियुक्त्या दिल्या जात आहेत. तर दुसरीकडे, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या



पदरी मात्र सलग कष्टाच्या आणि त्रासाच्या ड्युट्या पडत आहेत. हा दुजाभाव करताना कोणताही सेवाज्येष्ठतेचा किंवा नियमांचा विचार केला जात नसून, फक्त वरकमाई आणि मर्जी सांभाळणाऱ्यांनाच झुकते माप दिले जात असल्याचे बोलले जात आहे.

**कर्मचाऱ्यांमध्ये धुसफूस आणि नाराजी**

या पक्षपाती कारभारामुळे २४ तास ऑन ड्युटी राहून जनतेची सेवा करणाऱ्या सामान्य पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. ''आम्हीही पोलीस दलाचेच घटक आहोत, मग आमच्यासोबतच असा दुजाभाव का?'' असा संतप्त सवाल नाव न सांगण्याच्या अटीवर काही कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. या अंतर्गत राजकारणामुळे कर्मचाऱ्यांच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होत असून, याचा थेट परिणाम पोलीस ठाण्याच्या कामकाजावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

... तर ढिकले साहेब तात्काळ बदली करणार का?

नेवासा पोलीस ठाण्याचा पदभार नुकताच हाती घेतलेले धडाडीचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले साहेब यांच्याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. ढिकले साहेब हे आपल्या कडक शिस्तीसाठी आणि पारदर्शक कारभारासाठी ओळखले जातात. त्यामुळे पोलीस ठाण्यातील हा ड्युटीचा बाजार आणि मनमानी कारभार ते मोडीत काढणार का, हा मोठा प्रश्न आहे.

पोलीस वर्तुळातील खमंग चर्चा: ''साहेब, या मर्जीतील कंपनी चालकाला तात्काळ नारळ देऊन, त्याच्या जागी एखाद्या कार्यक्षम आणि निष्पक्ष व्यक्तीची नियुक्ती करणार की जुनीच री ओढली जाणार?'' अशी उघड चर्चा आता पोलीस ठाण्याच्या आवारात रंगू लागली आहे.आता पोलीस निरीक्षक ढिकले साहेब या गंभीर प्रकारात स्वतः लक्ष घालून, कर्मचाऱ्यांमधील ही नाराजी दूर करण्यासाठी संबंधित कंपनी चालकाची अन्यत्र तात्काळ उचलबांगडी करतात की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल!

---

शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला आणि

## श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे पूर्व आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्चप्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) फेब्रु.२०२६ मध्ये सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील ३८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये एकूण ३० विद्यार्थी पात्र झाले आहेत. प्रशालेचा एकूण निकाल ७९ टक्के लागला आहे.

तसेच श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत १७ विद्यार्थी पात्र (इयत्ता ८ वी) फेब्रु.२०२६ मध्ये विद्यालयातील २० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये एकूण १७ विद्यार्थी पात्र झाले आहेत. विद्यालयाचा एकूण निकाल ८५ टक्के लागला आहे.

यावेळी बोलताना संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले कि विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीचे द्योतक नाही, तर संस्थेच्या गुणवत्तापूर्ण कार्यपद्धतीचे प्रतीक आहे. प्रत्येक शिक्षकाने दिलेले मार्गदर्शन, पालकांनी दाखवलेला विश्वास आणि विद्यार्थ्यांनी केलेले कठोर परिश्रम यांचा हा एकत्रित परिणाम आहे. आगामी काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आमचे विद्यार्थी आपली छाप उमटवतील, असा आम्हाला विश्वास आहे.

व्हाईस चेअरमन दशरथ खोसे म्हणाले की, आजचा काळ हा ज्ञान, कौशल्य आणि नवोन्मेष यांचा संगम असलेला आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते, त्यांच्या आकलनशक्तीत वाढ होते आणि ते केवळ पाठांतरावर न थांबता संकल्पनात्मक शिक्षणाकडे वळतात. शिशु संगोपन संस्थेने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे.''

सचिव र,धो .कासवा म्हणाले कि आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता ज्ञानाच्या शोधात राहणे आवश्यक आहे. अशा परीक्षांमुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द विकसित होते. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही नेहमीच पाठबळ देत राहू.''

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी प्रास्ताविक केले तर आभार माध्यमिकचे मुख्याध्यपक दत्तात्रय कसबे यांनी मानले. सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा व्हा. चेअरमन दशरथ खोसे , सेक्रेटरी र.धों. कासवा , सहसेक्रेटरी राजेश झालानी ,खजिनदार ॲड विजय मुनोत तसेच सर्व विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे, मुख्याध्यापिका योगिता गांधी व सर्व सेवकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.

## पवन नागरी पतसंस्थेकडून सभासदाला थार गाडीचे कर्जवाटप

**सभासदांच्या प्रगतीसाठी पतसंस्था कायम कटिबद्ध व्हाईस चेअरमन आशा चौरे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्वसामान्य सभासदांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध कर्ज योजना प्रभावीपणे राबविणाऱ्या पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद गौरव राऊत यांना चारचाकी थार वाहनाचे कर्जरूपी वितरण करण्यात आले. संस्थेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला पदाधिकारी, संचालक, सभासद आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वाहन वितरणानंतर सभासद गौरव राऊत यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी चेअरमन किरण धारक, व्हाईस चेअरमन आशा चौरे, संचालक बाळासाहेब हुच्चे, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरिया, मनोज क्षीरसागर, दीपक भागवत, अभय काळे, जालिंदर चौरे, सागर डोळसे, ॲड. अमित राशिनकर, ॲड. संदीप पडोळे, मधुरा जोशी, नंदकुमार गुरसाळे, सागर सातपुते, व्यंकटेश जोशी, कविता डोळसे, मृणाल तिवारी आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाहनाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सभासद गौरव राऊत यांना वाहनाची चावी सुपूर्द करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक बळ मिळत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

व्हाईस चेअरमन आशा चौरे म्हणाल्या, ''सभासदांचा विश्वास हीच पतसंस्थेची सर्वात मोठी ताकद आहे. प्रत्येक सभासद आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, त्याच्या गरजा वेळेत पूर्ण व्हाव्यात यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. केवळ कर्जपुरवठा न करता सभासदांच्या प्रगतीचा भागीदार होण्याची भूमिका संस्था पार पाडत आहे. आज अनेक कुटुंबे व्यवसाय, शेती आणि उद्योगासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून पुढे येत आहेत. सभासदांच्या स्वप्नांना गती देण्याचे काम पवन नागरी पतसंस्था करत असून भविष्यात आणखी आकर्षक योजना राबवून सभासदांना अधिक सक्षम करण्याचा मानस आहे

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की ''सहकार क्षेत्र हे ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिक विकासाचे प्रभावी माध्यम आहे. सभासदांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास ही आमच्यासाठी प्रेरणा आहे. पारदर्शक व्यवहार, तत्पर सेवा आणि विश्वासार्हता यामुळे पवन नागरी पतसंस्था अल्पावधीत नागरिकांच्या पसंतीस उतरली आहे. पुढील काळात युवक, महिला आणि लघुउद्योजकांसाठी विशेष योजना राबविण्याचा संस्थेचा प्रयत्न राहील.

चेअरमन किरण धारक यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''सभासदांची प्रगती हीच संस्थेची खरी ओळख आहे. आर्थिक अडचणीच्या काळात सभासदांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सक्षम करण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता ठेवून सभासदांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रास्ताविक मनोज क्षीरसागर यांनी केले. त्यांनी संस्थेच्या विविध कर्ज योजना व भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन दत्तात्रय डोळसे यांनी केले तर आभार दीपक भागवत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## बोरुडे यांच्या सारख्या सेवाव्रतींच्या कार्यामुळे समाजाला दिशा – कॅप्टन संजय कुमार

**जालिंदर बोरुडे शिर्डीत महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानित**

**नेत्र तपासणी शिबिर, नेत्रदान, अवयवदान जनजागृतीत योगदानाची दखल**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना शिर्डी येथे बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आणि नेत्रदान या चळवळीत सक्रीय योगदान देऊन समाज परिवर्तनासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल हा सन्मान बोरुडे यांना प्रदान करण्यात आला. साई पालखी निवारा सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात कॅप्टन संजय कुमार यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संदीप कोळी, नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते, उद्योजक संजय वाबळे, अभिनेत्री निवेदिता पगार, महसूलचे सुरेश घोडके, फाऊंडेशनचे अध्यक्ष अभिषेक तुपे आदींसह सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कॅप्टन संजय कुमार म्हणाले की, जालिंदर बोरुडे सारख्या सेवाव्रतींच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळत आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे. लाखो व्यक्तींचे नेत्रदोष दूर करुन त्यांनी गरजूंना आधार दिला असल्याचे ते म्हणाले. तसेच पोलीस निरीक्षक संदीप कोळी व नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते यांनी आपल्या मनोगतामध्ये फिनिक्स फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे. त्यांनी स्वखर्चाने विविध शिबिरे आयोजित करून हजारो गरजू आणि नेत्रदोष असलेल्या रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी दिली आहे. याशिवाय त्यांनी नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाची जागृती करून अनेकांकडून नेत्रदान घडवून आणले आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रमही सातत्याने राबविले जात आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## स्वरमयी 'संगीत गुरूचरित्रांने भक्तिभाव जागवला

**सनातन धर्म सभेत कुलकर्णी दाम्पत्याचे सादरीकरण; दत्तभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सनातन धर्म सभा येथे आयोजित 'श्री. संगीत गुरूचरित्र पारायण' कार्यक्रमात भक्तिरसाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. श्री सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांनी पद्यरूपी गुरूचरित्राचे सुमधुर गायन सादर करत उपस्थित दत्तभक्तांना मंत्रमुग्ध केले.

या पद्यरूपी गुरूचरित्राचे रचनाकार श्री शिवरूपी महाराज हे उत्तर हिंदुस्थानातील रहिवासी होते. शिवस्वरूप विनरावजी हे त्यांचे मूळ नाव असून हिंदी ही त्यांची मातृभाषा होती. उर्दू, पारसी, संस्कृत व मराठी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इंग्रजांच्या काळात अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी ईश्वरभक्तीच्या प्रेरणेने पदाचा राजीनामा देत श्री घृष्णेश्वर मंदिर येथे सेवा सुरू केली.

गुरूचरित्राच्या अनुष्ठानादरम्यान त्यांची भेट गुरु श्री ब्रह्मानंद स्वामी यांच्याशी झाली. त्यांच्या आज्ञेनुसार सात भाग आणि सुमारे १०८ पदांनी समृद्ध असे हे 'संगीत गुरूचरित्र' तयार झाले. उत्कृष्ट काव्य असूनही छपाईअभावी हा वारसा मर्यादित स्वरूपातच जतन झाला आहे.

कार्यक्रमात संवादिनीवर श्रीमती स्वाती आंबेकर तर तबल्यावर श्री अच्युत घबाडे यांनी सुरेल साथसंगत केली. सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांचा सत्कार पसायदानाची फेम भेट देवून गौरव करण्यात आला. यावेळी नीलकंठ देशमुख, दिनकर देशमुख, उमेश वाळुजकर, उमेश नगरकर व बंडोपंत मुळे यांच्यासह अनेक दत्तभक्त उपस्थित होते.

### स्व.अरुणकाका साहित्य नगरीत १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची उत्साहात सांगता

# तरुणांनी मोठ्या संख्येने साहित्याकडे यावे- योगेश सोमण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची स्व. अरुणकाका साहित्य नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. विविध साहित्यिक उपक्रम, चर्चासत्रे, 'असा मी घडलो' सत्र, पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळ्याने संमेलनाचा शेवट संस्मरणीय ठरला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण होते. यावेळी स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, संमेलनाध्यक्ष प्रा. संदीप सांगळे, आयएएस अधिकारी गुलाबराव खरात, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रेवनाथ कानडे, प्राचार्य डॉ. सुरेश पठारे, डॉ. सचिन पांडुळे, रमेश वाघमारे, हर्षल आगळे, शिवाजीराव देवढे, बापूसाहेब भोसले, राजेंद्र उदागे, ज्ञानदेव पांडुळे, सुनील गोसावी, अशोक कानडे, भगवान राऊत, भारत गाडेकर, तुकाराम गोंदकर, जयश्री झरेकर, डॉ. अनिल गर्जे, स्वाती ढोबळे, बबनराव गिरी, सुभाष सोनवणे, शर्मिला गोसावी, राजेंद्र पवार, रवींद्र दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी, राजेंद्र चोबे, गिरीश जाधव, हरिभाऊ नजन, राजेंद्र फंड, मकरंद घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर भारत गाडेकर यांच्या ''माणसाला वंदन'' गीताने झाली. त्यानंतर सुनील गोसावी यांनी प्रस्ताविकातून संमेलनाच्या वाटचालीचा आढावा घेतला. अध्यक्ष योगेश सोमण आणि स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. तसेच शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात योगेश सोमण यांनी आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, ''एका कुटुंबात जेवताना प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो; मात्र संवाद हरवत चालला आहे. साहित्य संमेलन हे फक्त कट्ट्यासारखे न राहता जिवंत संवाद निर्माण करणारे व्यासपीठ झाले पाहिजे.''

ते पुढे म्हणाले की, ''कवी आणि साहित्यिकांनी लोकांसमोर येऊन सादरीकरण करावे. साहित्यामध्ये आलेली मरगळ त्यामुळे दूर होईल. पुण्यात होणाऱ्या १०० व्या साहित्य संमेलनात युवक मोठ्या प्रमाणात सहभागी होतील, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लेखणीला मिळणारा प्रतिसाद पाहता भविष्यात शब्दगंध साहित्य संमेलनात युवकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात दिसेल.

स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणारे शब्दगंध साहित्य संमेलन हे आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून अविरतपणे पुढे चालू राहणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी आणि अशोक कानडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानदेव पांडुळे यांनी केले.

### इस्कॉनच्या श्रीमद् भागवत कथा सोहळ्यानिमित्त शहरात संकीर्तन शोभायात्रा उत्साहात

# कथा सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन)चे वतीने नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

आज सकाळी माळीवाड्यातील श्री विशाल गणपतीचे पूजन आणि महाआरती करण्यात आली. मंदिराचे पूजारी महंत संगमनाथ यांच्या हस्ते श्रीमद् भागवत ग्रंथाचे पूजन करण्यात आले. माळीवाडा देवस्थानचे विश्वस्त-सचिव अशोक कानडे, विश्वस्त चंद्रकांत फुलारी यांच्या हस्ते इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. श्री.कानडे यांनी इस्कॉनचा हा कथा सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा, अशी विशाल गणपती चरणी प्रार्थना केली. यावेळी श्रीपादसेवा दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, मदन कांबळे, मिलिंद चवंडके, मुकुंदसंजय दास, कमलिनी माताजी, डॉ.अंजली फाटके , भिंगार अर्बन बँकेचे संचालक कैलास खरपुडे, बबनराव गोरे, अशोक बाबर यांच्यासह इस्कॉनचे स्त्री-पुरूष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही शोभायात्रा माळीवाडा वेस, आयुर्वेद कॉलेज, नवीन टिळक रोड मार्गे माऊली सांस्कृतिक भवनमध्ये पोहोचली.

महिला केशरी रंगाच्या साड्या परिधान करून मंगल कलश घेऊन शोभायात्रेत सहभागी झाल्या होत्या. पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा पोषाख परिधान केला होता. फुलांनी सुशोभित केलेल्या रथात निताई (बलराम) आणि विश्वंभर (कृष्ण) हे नयनमनोहर विग्रह होते. हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे हरे राम हरे राम राम राम हरे हरे हे संकीर्तन मधुर स्वरात करत ही शोभायात्रा कथा स्थळी माऊली सांस्कृतिक भवनमध्ये पोहोचली.

आज सायंकाळी ५.३० वाजता पुण्यातील इस्कॉन मंदिराचे ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांच्या अमृतवाणीमधून श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा श्रीगणेशा करण्यात येणार आहे. दि.३१ मे २०२६ पर्यंत दररोज सायंकाळी ५.३० ते रात्री ८.३० या वेळेत कथा निरूपण केली जाईल. शहरातील जास्तीत जास्त भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांनी केले आहे.

# ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर संस्थेच्या अध्यक्षपदी संपत बारस्कर यांची बिनविरोध निवड

### मुख्य विश्वस्तपदी इंजि. बबनराव कातोरे तर सचिवपदी डॉ. भूषण अनभुले यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**







**अहिल्यानगर–** ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच मुख्य विश्वस्त प्रवर्तकपदी इंजिनिअर बबनराव कातोरे तर सचिवपदी डॉ. भूषण अनभुले यांची निवड करण्यात आली असून धर्मदाय उपायुक्त कार्यालय, अहिल्यानगर यांनी या निवडीस अधिकृत मंजुरी दिली आहे. त्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्याला नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

संस्थेच्या मागील कार्यकारी मंडळाचा कार्यकाल संपल्यानंतर दिनांक ९ मे रोजी संस्थेच्या आजीव सभासदांची सभा पार पडली. या सभेमध्ये संस्थेच्या घटनेतील कार्यकारी मंडळ निवडीच्या तरतुदीनुसार नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. त्यानंतर सदर बदल अर्ज धर्मदाय उपायुक्त कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्या अर्जास अखेर मंजुरी मिळाल्याची माहिती नूतन अध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिली.

या नव्या कार्यकारी मंडळामध्ये उपाध्यक्षपदी रावसाहेब सप्रे, खजिनदारपदी सुदाम भोर, विश्वस्त प्रवर्तक म्हणून प्रकाश गुगळे, शरद भोर, शांताराम गाडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्यकारी सदस्य म्हणून दिगंबर सप्रे, ॲड. विक्रम वाडेकर, प्रवीण कातोरे, क्रांतीकला अनभुले, भालचंद्र शिरोडे, भगवान हावरे आणि निर्मला मुळे यांची निवड करण्यात आली आहे.

निवडीनंतर बोलताना अध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, ''आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण विकास मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण, शहरी तसेच एमआयडीसी परिसरातील कामगारांच्या मुलांना माफक फीमध्ये उत्तम शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

ते पुढे म्हणाले की, ''गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर भर देत त्यांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. संस्था नावारूपाला आणण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने काम केले जाईल.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. संस्थेच्या विकासासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांची ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. विशेष म्हणजे संपत बारस्कर यांनी याच संस्थेच्या शाळेमध्ये अकरावी ते बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. संस्थेचा विद्यार्थी ते संस्थेचा अध्यक्ष असा त्यांचा प्रवास अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# धोंडे जेवण आणि पाहुणचाराने चिमुकले भारावले!

### अधिक मासानिमित्त राजेंद्र शेडाळे यांच्यातर्फे बालघर प्रकल्पास मिष्टान्न भोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आई-वडिलांच्या मायेपासून दूर असलेल्या निरागस चेहर्यांवर अनपेक्षित धक्क्यामुळे आनंदाचे हास्य फुलले. तपोवन रस्त्यावरील रुद्रपूजा फाउंडेशन संचलित बालघर प्रकल्पातील मुलांना राजेंद्र शेडाळे यांनी अधिक मासानिमित्त धोंडे जेवण दिले. या आगळ्यावेगळ्या पाहुणचाराने मुले मात्र अक्षरशः भारावून गेले होते.

अहिल्यानगर शहरातील सावेडी उपनगरात तपोवन रोडवर रूद्रपूजा फाउंडेशन संचलित बालघर प्रकल्प आहे. या प्रकल्पात वंचित व गरजू मुलांचे संगोपन केले जाते. लोकसहभागातून चालणार्या या प्रकल्पात अनेक दानशूर व्यक्ती मदतीद्वारे आपला खारीचा वाटा उचलतात. राजेंद्र शेडाळे हेही त्यापैकीच एक. सध्या अधिक मासानिमित्त त्यांनी बालघर प्रकल्पातील मुलांना धोंडे जेवण देण्याचा संकल्प केला. त्यानुसार शेडाळे कुटुंबीयांनी बालकांसाठी धोंडे जेवण कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रकल्पातील प्रत्येक विद्यार्थ्याचा यथायोग्य सन्मान करून शाही पद्धतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या भोजनाकडे शेडाळे कुटुंब आपुलकीने आणि प्रेमाने लक्ष दिले. या आगळ्या-वेगळ्या पाहुणचारामुळे विद्यार्थ्यांच्या आनंदी चेहर्यावर समाधान स्पष्ट दिसत होते. या वेळी शेडाळे व सोनवणे कुटुंबातील सदस्य, तसेच बालघर प्रकल्पाचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी राजेंद्र शेडाळे म्हणाले की, समाजातील वंचित मुलांना आधार देणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. वंचितांच्या चेहर्यावर फुलणारे हास्य पाहून कमालीचे समाधान लाभते. अधिक मासानिमित्त पाहुण्यांना धोंडे जेवण देण्याची प्रथा आहे. वंचित मुलांच्या रूपातील पाहुण्यांना भोजन देण्याचे भाग्य आज आम्हाला लाभले.

आभार व्यक्त करताना बालघर प्रकल्पाचे समन्वयक युवराज गुंड म्हणाले की, राजेंद्र शेडाळे हे नेहमीच मुलांना मदतीचा हात देतात. शेडाळे कुटुंबीयांनी मुलांना धोंडे जेवण दिले, तसेच आपुलकीने विचारपूस करून आई-वडिलांच्या मायेची ऊब दिली. मुलांना केवळ अन्नाचीच नव्हे तर जिव्हाळा व मायेच्या स्पर्शाचीही गरज असते.

# अहिल्यानगरच्या नवीन एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग आणून युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार – आ. संग्राम जगताप

### प्रभाग क्रमांक दोनमध्ये सूर्यानगर ते सनी हॉटेल रस्ता व पुलाच्या कामाचे भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरामध्ये नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामांची घोडदौड सुरू असून मुंबईच्या धर्तीवर दर्जेदार रस्ते निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुढील वीस वर्षांचा विचार करून शहरातील विकासकामे मार्गी लावली जात आहेत. नगरकरांनी दिलेल्या मतांच्या आशीर्वादामुळेच विकासकामांसाठी मोठा निधी आणणे शक्य झाले असून नागरिकांच्या सहकार्यामुळे शहराच्या प्रत्येक भागात विकासाची गंगा पोहोचत असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

प्रभाग क्रमांक दोन मधील सूर्यानगर ते सनी हॉटेलपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व पुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक महेश तवले, नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, माजी नगरसेविका रूपालीताई वारे, गोविंद वाघ, राजेंद्र बुधवंत, महादेव दानवे, राहुल सांगळे, संपत नलवडे, दत्तात्रेय गावडे, एकनाथ चेमटे, वैभव ढाकणे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप पुढे म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून शिर्डी येथे डिफेन्स क्षेत्रातील मोठे युनिट उभारण्यात आले असून त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. पुढील वर्षापर्यंत अहिल्यानगरच्या नवीन एमआयडीसीमध्ये आणखी मोठा उद्योग आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून त्याचा थेट फायदा शहरातील युवकांना रोजगाराच्या स्वरूपात होणार आहे. विकासकामांसोबतच बाजारपेठांची आर्थिक उन्नती आणि युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीही काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सूर्यानगर परिसराला जोडणाऱ्या या मुख्य रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच या रस्त्यावरील पुलाचे कामही मार्गी लागल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नगरसेवक महेश तवले म्हणाले की, प्रभाग क्रमांक दोनमधील सूर्यानगर परिसराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याचे काम मार्गी लागावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मंजूर केले.

## दुःखद निधन वार्ता : पारनेर बाजार समितीचे माजी सभापती बाबासाहेब तरटे यांच्यावर पितृशोक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–**पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) पारनेर तालुका अध्यक्ष श्री. बाबासाहेब तरटे यांचे वडील कै. भिमाजी रामजी तरटे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच भाळवणी परिसरासह संपूर्ण पारनेर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

कै. भिमाजी रामजी तरटे हे शांत, मनमिळावू व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात त्यांचा मोठा जनसंपर्क होता.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. तरटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिकांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

त्यांचा अंत्यविधी सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता वैकुंठधाम स्मशानभूमी, भाळवणी येथे पार पडला. तसेच दशक्रिया विधी मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी भाळवणी येथे होणार आहे.

कै. भिमाजी रामजी तरटे यांच्या निधनाबद्दल विविध राजकीय, सामाजिक व सहकारी क्षेत्रातील मान्यवरांकडून तरटे परिवाराचे सांत्वन करण्यात येत आहे.

(पान १ वरून)

## ब्लुलाईन आणि रेडलाईन शिथिल करण्याबाबत शासन दरबारी पाठपुरावा करणार - भगवान फुलसौंदर

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले कि महासभेत त्याचा ठराव सादर कण्याचे सांगितले तसेच जे काही सहकार्य लागेल ते करण्याचे सांगितले

शरद ठाणगे, अभय आगरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करत या लढ्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत हा प्रश्न केवळ काही भागापुरता मर्यादित नसून संपूर्ण शहराच्या विकासाशी संबंधित असल्याचे अधोरेखित केले. विचार मंचाच्या माध्यमातून पुढील काळात व्यापक जनआंदोलन उभारण्याचे संकेतही यावेळी देण्यात आले.

किशोर डागवाले म्हणाले कि शहरातील बांधकाम क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी हा प्रश्न मार्गी लागणे अत्यावश्यक असल्याचे मत यावेळी अनेकांनी व्यक्त केले. पूरनियंत्रण रेषेमुळे हजारो प्लॉटधारकांची गुंतवणूक अडकून पडली असून, अनेक ठिकाणी विकासकामे थांबली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी बैठकीतून करण्यात आली.आगामी काळात आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली मोठी बैठक घेण्यात येणार असून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

यावेळी बोलताना माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी सांगितले की, २०१९ मध्ये सीना नदी परिसरातील काही भागांमध्ये आखण्यात आलेल्या पूरनियंत्रण रेषेमुळे हजारो प्लॉटधारक, व्यापारी आणि नदीकाठावरील नागरिक अडचणीत सापडले आहेत. चुकीच्या पद्धतीने आखलेल्या नियंत्रण रेषेमुळे अनेक चांगले प्लॉट बांधकामासाठी अपात्र ठरले असून, नागरिकांना स्वतःच्या जागेवर घर किंवा व्यावसायिक इमारत उभारता येत नाही. काही अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी आलेल्या मोठ्या पुरानंतर शासनाने पूरनियंत्रण रेषा आखण्याचा निर्णय घेतला होता; मात्र अहिल्यानगरमध्ये या रेषा वास्तव परिस्थितीचा अभ्यास न करता आखण्यात आल्याने शहराच्या विकासालाच मोठा फटका बसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फुलसुंदर पुढे म्हणाले की, गेल्या सात वर्षांपासून सुमारे ३५ हजार प्लॉटधारकांचे आर्थिक नुकसान होत आहे. अनेक नागरिकांनी आयुष्यभराची कमाई गुंतवून प्लॉट घेतले; मात्र आज त्या जागांवर बांधकाम करता येत नसल्याने ते हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी पत्र्याचे शेड उभारून तात्पुरता व्यवसाय सुरू केला असला तरी त्यामुळे महापालिकेलाही मालमत्ता कराच्या स्वरूपात मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सीना नदी खोलीकरणासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. खोलीकरणानंतर नदीची वहनक्षमता वाढणार असल्याने भविष्यात पूरनियंत्रण रेषेपर्यंत पाणी येण्याचा धोका कमी होईल. त्यामुळे विद्यमान चुकीच्या रेषा तातडीने स्थगित करून नागरिकांना न्याय द्यावा, यासाठी सर्व नगरसेवक आणि बाधित नागरिकांच्या सहकार्याने मोठा लढा उभारला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यांनी विचार मंच स्थापनेमागील भूमिका स्पष्ट करत नागरिकांना एकत्र येण्याचे आवाहन केले.

प्रास्तविक राहुल व्यवहारे यांनी केले तर आभार दत्ता गाडळकर यांनी मानले

### आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका – किरण काळे

हक्कांसाठी ठाकरे शिवसेना तुमच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. हा केवळ काही व्यक्तींचा प्रश्न नसून हजारो कुटुंबांच्या भविष्याशी संबंधित विषय आहे.

प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करणार :

किरण काळे म्हणाले, यापुढे शासन, प्रशासन आणि संबंधित विभागांकडे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी ठाकरे शिवसेनेकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल. बाधितांना न्याय मिळावा, पूररेषेचा पुनर्विचार व्हावा आणि सर्वांना दिलासा देणारा मार्ग काढावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले जातील, असे काळे यांनी म्हटले आहे.